जनसामान्यांची महाशक्ती

# नवशक्ति

वर्ष ८५ वे अंक : १९८ | बुधवार, २९ मे २०१९ | पाने : २० | किंमत ३ रुपये

## लीलावती विजयी; रुपेशची हॅट्ट्रिक, मनोहरचे अर्धशतक

**आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट**

वृत्तसंस्था

मुंबई, मंगळवार - अष्टपैलू रुपेश कोंडाळकरची हॅटट्रीक व मनोहर पाटेकरचे अर्धशतक यामुळे लीलावती हॉस्पिटल क्रिकेट संघाने ग्लोबल हॉस्पिटलचा ७६ धावांनी पराभव केला आणि माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे यांच्या वाढदिवसानिमित्तच्या द्वितीय आयडियल आंतर हॉस्पिटल टी-२० क्रिकेट स्पर्धेची दुसरी फेरी गाठली.

सलामीवीर योगेश परब, महेश गोविलकर व संतोष साळुंखे यांनी ४ बाद १०४ धावा असा दमदार प्रारंभ ग्लोबल हॉस्पिटल संघाला करून दिला असताना डावखुरा फिरकी गोलंदाज रुपेश कोंडाळकरच्या हॅटट्रीकने सामना लीलावती हॉस्पिटलच्या बाजूने झुकविला. लोकसेवा फौंडेशन व आयडियल स्पोर्ट्स-क्रिकेट क्लबतर्फे माहीम ज्युवेनील स्पोर्ट्स क्लब व फेअर प्ले स्पोर्ट्स सहकार्याने ही स्पर्धा शिवाजी पार्क मैदानात सुरु आहे.

स्वराज्य फौंडेशनचे अध्यक्ष उदय पवार व आंबेकर प्रतिष्ठान हॉटेल मनेजमेंटचे संचालक विलास डांगे यांच्या उपस्थितीत नाणेफेक होऊन ग्लोबल हॉस्पिटल विरुद्ध लीलावती हॉस्पिटलने प्रथम फलंदाजी केली. लीलावती हॉस्पिटलच्या सलामीवीर मनोहर पाटेकर (५१ धावा), वीरेंद्र दांडेकर (४३ धावा), धर्मेश स्वामी (नाबाद ४७ धावा), रुपेश कोंडविलकर (३७ धावा) आदी आघाडी खेळाडूंनी दमदार फलंदाजी केली. त्यामुळे कपिल गमरे (१ बळी), संतोष साळुंके (१ बळी) व सुनील सकपाळ (१ बळी) यांनी छान गोलंदाजी करुनही लीलावती हॉस्पिटलने मर्यादित २० षटकात ३ बाद १९७ धावा फटकाविल्या.

डावखुरा फिरकी गोलंदाज विशाल शिंदेच्या पहिल्याच षटकातील चौथ्या व सहाव्या चेंडूवर ग्लोबल हॉस्पिटलचे भरवंशाचे फलंदाज डॉ. संदीप आंग्रे व संकेत सुर्वे हे दोघेही धावांचे खाते उघडण्यापूर्वीच तंबूत परतले. त्यानंतर मात्र सलामीवीर योगेश परब (३० धावा), महेश गोविलकर (३५ धावा) व संतोष साळुंखे (४१ धावा) यांनी ग्लोबल हॉस्पिटल संघाला ४ बाद १०४ धावा अशी विजयाकडे कूच करणारी फलंदाजी करून दिली. परंतु त्याचवेळी कप्तान रुपेश कोंडाळकरने ग्लोबल हॉस्पिटलचे लागोपाठ ३ फलंदाज तंबूत पाठवित स्पर्धेतील पहिली हॅटट्रीक नोंदविली. परिणामी प्रतिस्पर्ध्यांना १५ व्या षटकाला १२१ धावांत गुंडाळून लीलावती हॉस्पिटलने मोठा विजय मिळविला.

छापून प्रसिध्द केले. दिल्ली कार्यालय : १/१८ आय.एन.एस. बिल्डिंग, रफी मार्ग, नवी दिल्ली. ११०००१. कोलकाता कार्यालय : ८, मोइरा, स्ट्रीट, कोलकाता- ७०००१७. RNI No. 1691/57
व्यवस्थापकीय संपादक : गिरधरलाल लखोटिया, संपादक: सुकृत खांडेकर Reg. No. MCS/049/2018-20
NLY. E-Mail : navshakti.news@gmail.com/ mail@fpj.co.in